**चंद्रपूर येथे होणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत...**

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांक सासंअ-२०११/प्र.क्र.११३/२०११/भाषा -३
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६.१.२०१२

**<u>प्रस्तावना :-</u>** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ८५ वे अखिल भारतीय मराठी सहित्य संमेलन चंद्रपूर येथे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ ते दिनांक ५ फेब्रुवारी २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. या साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी शासकीय अर्थसहाय्य मिळावे म्हणून श्री.शांताराम पोटदुखे, स्वागताध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, चंद्रपूर यांनी विनंती केली आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष व चंद्रपूर शहराची पंचशताब्दी (५०० वर्षे) या दोन ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर येथे संपन्न होणा-या या साहित्य संमेलनास शासनाकडून अर्थसहाय्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय :-</u>** या शासन निर्णयान्वये, दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ ते दिनांक ५ फेब्रुवारी २०१२ या कालावधीत चंद्रपूर येथे होणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी रुपये २५,००,०००/- ( रुपये पंचवीस लाख फक्त) इतके अर्थसहाय्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून संबंधित संस्थेला मंजूर करण्यात येत आहे.

१) राजीव गांधी अभियांत्रिकी महाविदयालय, चंद्रपूर येथे होणाऱ्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी सहित्य संमेलनाच्या कामाचा अहवाल व शासन केलेल्या अर्थसहाय्याच्या लेख्याची कागदपत्रे, अर्थसहाय्याच्या विनियोगाच्या प्रमाणपत्रासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या मार्फत शासनास सादर करावा.

२) राजीव गांधी अभियांत्रिकी महाविदयालय, चंद्रपूर येथील संस्थेने महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर यांच्या निरिक्षणासाठी खर्चाचे लेखे तयार ठेवावेत. संस्थेने लेख्याचे परिक्षित विवरणपत्र (ऑडिटेड स्टेटमेंट ऑफ अकाऊंट्स) व अर्थसहाय्याचे उपयोगिता प्रमाणपत्र (युटीलायझेशन सर्टिफिकेट) मागणीनुसार वेळेवेळी उपलब्ध करुन द्यावे.

३) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांच्या यंत्रणेकरवी लेखा परीक्षण करावे.

४) अर्थसहाय्याबाबतची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर किंवा त्यांचे अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

२. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

.....२/-

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडएफ- ०२, २२०५- कला व संस्कृती - १०२, कला व संस्कृती प्रचालन (०१) योजनेतर योजना (०१)(०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३१७ २), ३१ - सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक १०.०६/प्र.क्र.१/अर्थोपाय, दिनांक २०/०४/२००६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३६५०७१३३)

(कि.रा.कुलकर्णी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

१. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
५. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा) , महाराष्ट्र , मुंबई
६. मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय-४/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
८. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ (सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेमार्फत)
९. स्वागताध्यक्ष, ८५ वे अखिल भारतीय मराठी सहित्य संमेलन द्वारा डॉ किर्तीवर्धन दीक्षित, राजीव गांधी अभियांत्रिकी महाविदयालय, चंद्रपूर
१०. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती, भाषा - ३